# <u>भारताचे भवितव्य - मेक इन इंडिया</u>

शुक्रवारचा दिवस, युनिवर्सिटीचे लेक्चर्स संपवून शनिवार रविवार साठी सामान आणायला बाहेर पडलेलो. वरण भातासाठी तुरडाळ, तांदुळ आणि पोळीसाठी पीठ मिळण्याचे ठिकाण म्हणजे डसलडर्फचे इंडियन स्टोअर. जर्मनीत असल्यावर एक गोष्ट ध्यानात ठेवावी लागते कि शनिवार रविवार सुट्टी म्हणजे सर्व बंद, आरामाचा दिवस. क्लीवज् सारख्या छोट्याश्या गावात तर सामसूम, म्हणून पोटोबाची सोय शुक्रवारी करून ठेवावी लागते. खरेदी झाली आणि निघालो घरी यायला. इथे अजुनही ट्राम्स आहेत आणि बाहेर पडतो ना पडतो तो समोर ट्राम आणि त्याच्यावर दिसला ' मेक इन इंडिया' वाला सिंह. आता हा इथे कुठे आला ? वाचले तर समजले कि पुढच्या आठवड्यात जगातील सर्वात मोठे टेक्नोलॉजिकल फेअर 'हॅनओवर' ला आहे आणि पार्टनर देश आहे इंडिया !

उच्चशिक्षणासाठी जर्मनीला आलेलो आणि त्यात टेक्नोलॉजिकल फेअर म्हणजे झालच, ते असतं काय ते माहित होते पण पुढच्या आठवढ्यात आहे ते नव्हते माहित, त्यातून आपले आदरणीय प्रधानमंत्री 'मेक इन इंडिया' चे निर्माते आणि पुरस्कर्ते येत आहेत हे पाहिले, घरी परतताना वेळ घालवण्यासाठी विषय मिळाला. डसलडर्फ ते क्लीवज् 1.30 तासाचा प्रवास, स्थान ग्रहण केले आणि उघडला लॅपटॉप. हॅनओवर फेअर टाकले आणि इंजिनिअरसाठीचा खजिनाच मिळाला. " PM Narendra Modi coming with Make in India Campaign " वाचले आणि विचारचक्र सुरु झाले, मेक इन इंडिया बद्दल.

भारताच्या औद्योगिक विस्तार आणि प्रचारासाठी चालू केलेली 'मेक इन इंडिया कॅम्पेन' जर्मनीपर्यंत येऊन पोचली. भारतातल्या इंडस्ट्रीजना प्रमोट करण्यासाठी , इंटरनॅशनल एक्सपोजर मिळवून देण्यासाठी घेतलेला इनिशीएटीव कौतुकास्पद आहे, पण आता तो सिंह अशा देशात आहे जिथे तो सिंह नाही मांजर आहे. "मेड इन जर्मनी" ह्या क्षेत्रातील राजे आहेत आणि बाकी सगळे त्याला विजयी होण्यासाठी मदत करणारे शिपाई. माझा तरी अनुभव आहे, इंजीनीरिंग क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाचाच असेल, मेड इन जर्मनीचा स्टॅम्प असेल तर डोळे मिटून ती गोष्ट विकत घ्यावी इतका विश्वास आहे. अशी काय जादू आहे जर्मनी मध्ये ज्यामुळे

उद्योग विश्वात त्याचा दबदबा आहे, भारतातील उद्योजकांना काय शिकता येईल आणि मेक इन इंडिया चे भवितव्य काय असेल ह्याचे अनुमान थोडक्यात पण स्पष्टीकरणासाहित द्यायला मला आवडेल.

मेक इन इंडिया भारतातील लघु आणि मोठ्या उद्योगांबद्दल आहे. बहुतांशी लघु उद्योगांना प्रोत्साहन आणि इंटरनॅशनल एक्सपोजर देण्यासाठी आहे. लघु उद्योग टेक्नोलोजी मधले म्हणजे स्पेअर पार्ट्स किंवा टूल बनवणारे आणि छोट्या स्तरावर चालू झालेले हे उद्योग त्यात काम करणारे इंजिनियर्स, टेक्निशियन्स. सुरुवात होते शिक्षणापासून. जर्मनीशी तुलना केली,हे लोक तुमच्या डिग्री सर्टिफिकेटना कागदा इतकेच महत्व देतात, ते बघतात तुमचे त्या विषयातील कौशल्य आणि एक्सपरटाइस. अर्थात डिग्री बघतात पण त्यापेक्षा जास्त एप्लिकेशन पार्ट बघतात. तुम्ही शिकलेल्या ज्ञानाचा कसा उपयोग केलात तुमच्या प्रोजेक्ट मध्ये किंवा इंटर्नशिपमध्ये. आपल्या कडे बोलायला वाईट वाटते पण विचारधारा अशी आहे की 'मला काय फक्त डिग्री हवीय' जिथे प्रवेश मिळेल ते शिक्षण घ्यायचे. ठरलेले प्रश्न ठरलेली उत्तरे. त्याच्या व्यतिरिक्त शंका विचारायची / वेगळा विचार मांडायची परवानगीच नाही. पेपरचा pattern पण ठरलेला. Syllabus मार्कात वाटलेले. मग पाठांतर करून किंवा कॉपी करून पास व्हायचे आणि मिळेल ती नोकरी करायची पगारासाठी. घेतलेल्या शिक्षणाचा कराव्या लागणाऱ्या कामाशी संबंध असेलच असे नाही. जिथे शिक्षकच गाईडचा वापर करून उत्तरे देतात तिथे मूलभूत विचार मांडायला आणि शंका समाधान करायला कुठला वाव असणार ? पाठांतर करून पेपर लिहायच्या इतक्या वर्षाच्या सवयीमुळे त्याची स्वतंत्र विचार करण्याची ताकद हरवूनच जाते .आणि अशा शिक्षणपद्धतीत डिग्री चा स्टॅम्प लागलेली मुले काय इनोवेटीव विचार मांडणार.

माझ्या स्वतच्या अनुभवावरून सांगतो, माझ्या सोबत जर्मन मुले आहेत शिकणारी , एका सेमिस्टर ला एकच विषय घेतील, अशाने त्यांचे मास्टर्स 4-5 वर्षे चालेल, पण ते त्या त्या विषयातील ' मास्टर 'असतील, कागदावर डिग्री असलेले इंजिनियर नसतील.

मेक इन इंडिया बद्दल बोलतोय तर इनोवेशन च्या बाबतीत सांगावे लागेल.  ह्या जगात काहीही अशक्य नाही म्हणतात. मी फक्त जर्मनी नाही तर जपान वगैरे इतर देशातील लोकांविषयी पण सांगतो, अशक्याला शक्य करून दाखवण्याची हिम्मत, ताकद आणि पेशन्स ह्यांच्यामध्ये आहे. भारतात एखाद्याने मेग्लेव वापरुन वॉशिंग मशीन बनवण्याचा विचार बोलून दाखवला तर त्याला वेड्यात काढतील. होतो वॉशिंग मशीन चा आवाज, होतो त्या आवाजाने त्रास पण 'चलता है' ही मेंट्यालिटी. इथे असे बोलले तर डिजाइन प्लान बनवायला लागतील, खर्च किती येऊ दे, जर तुमच्या आयुष्यातील रोज 10 मिनिटे वॉशिंग मशीन च्या आवाजापासून तुमची सुटका होणार असेल तर बनवतील हे लोक. इंडस्ट्रिज च्या बाबतीत पण तसेच.  स्वस्त स्वस्त बनवायला जातो आणि खर्च - फायदा - गुणवत्ता ही सफल होण्याची त्रिसूत्रि विसरून जातो. मेड इन चाइना चे कसे झाले, खर्च कमी करता करता क्वालिटीला विसरून गेले, आणि 'चाइना चा माल'  उदयास आला स्वस्त असतात मान्य पण टिकाऊ ? सगळ्यांनाच अनुभव असेल ह्याचा. तेच माझ्याकडे fable-castell ची पेन्सिल आहे, मी 8 वीत असताना दिलेली बाबांनी, जर्मनीहून आणलेली , अजूनही ड्राफ्टिंग साठी वापरतोय मी. असाच एक अनुभव माझी मामी, डेंटिस्ट आहे, मी जर्मनीला जातोय म्हटल्यावर बोलली येताना जमले तर काही इन्स्ट्रूमेंट्स घेऊन ये. साधा क्लिनिंग फॉर्क, स्कालपेल. इंडियात पण मिळते पण बाहेरून का मागवतात .... कारण कळले, 1980 साली जर्मनी हून आणलेली इन्स्ट्रूमेंट्स अजूनही मस्त आहेत. पण इंडियात घेतलेली वाकतात, मोडतात. ही आहे मेड इन जर्मनी ची ताकद. आता अशी गुणवत्तापूर्ण इन्स्ट्रूमेंट्स इंडियात बनवणे पण शक्य आहे, पण वाकत, मोडत असतील तर कोण खरेदी करेल. उत्पादन चांगले आहे हा विश्वास निर्माण करायला वेळ द्यावा लागतो आणि पेशन्स ठेवावा लागतो, कोणी घेत नाही म्हणून प्रॉडक्शन बंद केले, असे झाले तर बाहेर येऊन गर्जना करण्यापेक्षा गुहेतच गाडला जाईल आपला मेक इन इंडिया चा सिंह.

आता हे बोललो क्वालिटी,कॉस्ट,प्रॉडक्शन,एज्युकेशन बद्दल, दुसरी लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे काम करण्याची पद्धत, शिस्त आणि मराठीत म्हणतो तसे

ह्या लोकांना काम करण्याचे लागलेले वळण. ह्यांची जीवनशैलीच वेगळी आहे. पूर्ण युरोप मध्ये सोमवार ते शुक्रवार काम असते आणि शनिवार रविवार सुट्टी. सकाळी 8 ते 6 काम असते मध्ये 1 तासाचा लंच ब्रेक... बास.

आपल्याकडे पण बहुतांश इंडस्ट्रिजमध्ये असाच कामाचे पॅटर्न आहे. मग प्रॉब्लेम कुठे आहे. इथल्या इंडस्ट्रीज मध्ये गेलो तेव्हा फरक कळला. इथे  कामाच्या वेळेत फक्त काम करतात. त्या वेळेत मोबाइल, इंटरनेट अशी व्यवधाने वर्ज्य ! कामाच्या वेळेत काम सोडून दूसरा टाईमपास काहीही करता येत नाही. इथे पगार सुदधा कामाच्या तासानुसार मिळतो त्यामुळे त्या वेळेत फक्त कामच करावे लागते. कॉफी पितात काम करत करत . लंच च्या वेळेत जेवल्यावर थोड्या गप्पा किंवा डुलकी . परत वेळ संपेपर्यंत काम. सोमवार ते शुक्रवार काम करतील. शनिवार रविवार फूल मजा करतील. दारू पितील, नाचतील, पार्टी करतील, फॅमिली बरोबर भटकतील. फ्रेश मनाने परत सोमवारी 8 वाजता सगळी ओफिस फूल दिसतील. हे विशेष का जाणवते, भारतात सकाळी चहा प्यायल्याशिवाय ऑफिसात काम चालूच होत नाही आमच्या असे अभिमानाने सांगणारे लोक पाहिलेत मी. ठीक आहे चहा पिऊन जरी काम सुरू झाले तरी नंतर ही फेसबूक वर ऑनलाइन कसे असता हो? काम करता करता मध्ये मध्ये वाट्स अप चा बीप बीप पण चालू असतो. मीटिंगच्या वेळी फक्त सायलंट मोड. काम करताना एकीकडे ऑफिसच्या फोन वरुन घरी फुकट फोन. जेवला का? शाळेत गेला का? काय करतोय? विचारपूस किंवा मैत्रिणीशी किटी पार्टी ठरवण्यासाठी चर्चा चालू असते.
काही मित्रांचे bored in office, sleepy Monday, Sad meeting असले स्टेटस अपडेट येत असतात. स्टॅटिक्टीस वापरुन कॅलक्युलेशन केले तर दिवसाचे 4 तास पण सलग काम होत नाही सरासरी. आणि मग टार्गेट पूर्ण नाही झाले, प्रोजेक्ट एक्सटेन्शन द्या प्लीज म्हणून रडत बसा , असे होईल का मेक इन इंडिया सफल? आणि सहज बोलायचे म्हणून नाही तर ही टवाळक्या करण्याची सवय आपल्या अंगात भिनलीय. तुम्हाला खोट वाटेल पण एकदा जरी लेक्चरला लेट झालो तर इथले प्रोफेसर बोलतात ‘U Indians are always late” आता कधीही इंडियाला न

गेलेल्या जर्मन प्रोफेसर च्या मनात असले इंप्रेशन आहे आपले तर त्याला आपणच कारणीभूत आहोत.
मेक इन इंडिया च जो डंका पिटला जातोय,प्रमोशन, अभिमान वगैरे आपल्यापुरते ठीक आहे पण जरा इकडे येऊन बघा. इथल्या लोकांची काम करण्याची पद्धत , टेक्नॉलॉजी बघून खूप शिकण्यासारखे आहे. आता परवाच रतन टाटांचे जर्मनीतले अनुभव वाचले फेसबूक वर. अतिशय सुंदर वर्णन केलाय त्यांनी जर्मन लोकांचे . बहुतेक सर्वांनी वाचले असेलच. ह्या मोठ्या इंडस्ट्रिअलिस्टनी जग पाहिलाय, टेक्नॉलॉजी पहिलीय, ती टेक्नॉलजी भारतात आणण्यासाठी ते प्रयत्न करत आहेतच. पण आपल्याला अशी मेक इन इंडिया ब्रँड खाली पब्लिसिटी करावी लागतीय याचे दु:ख वाटते. जर्मनी Developed देश आहे, तिथली लोकसंख्या कमी आहे, ठीक आहे, पण टेक्नॉलॉजी मध्ये त्यांनी केलेली प्रगति कौतुकास्पदच आहे.
जागतिक युद्धात अर्ध्याहून जास्त उध्वस्त झालेला जर्मनी आणि आजूबाजूचे यूरोपियन देश, त्यानंतर त्यांनी घेतलेली झेप ,गरुडझेप आहे. आता इथे बोलत आहेत चौथी औद्योगिक क्रांति होणार आहे आणि त्यात सर्वात जास्त भरीव वाटा हा जर्मनीचा असेल. मेक इन इंडियातून संधी आहे आपली ताकद दाखवण्याची आणि अस्तित्व सिद्ध करायची. स्वस्त स्वस्त गाजावाजा करून चंद्रयान सोडले आपण, काही दिवसात कंट्रोल गेला त्याचा आणि अवकाशात गडप झाले, कोणी पहिली का त्या फेल्युअर ची बातमी ? सांगायला गेले तर शब्द अपुरे पडतील एवढी तफावत,डीफरन्सेस आहेत पण आता ठीक आहे आता प्रयत्न करतोय तर जर्मनी सारखे उदाहरण समोर ठेऊन प्रयत्न करावा लागेल. त्यांचे अनुकरण बीयर प्यायच्या बाबतीत करायचे सोडून टेक्नॉलॉजी डेवलपमेंट च्या बाबतीत पण केले पाहिजे. गुहेतल्या सिंहाला बाहेर येऊ द्या, मोकळा श्वास घेऊ द्या.

BRICKS देशांपैकी एक सुपर पॉवर आहोत आपण, भारत. माझ्यासारखी कित्येक मुले उच्च शिक्षणासाठी इथे आलेत , का आले इथे, भारतात पण मास्टर डिग्री साठी कॉलेज आहेत चांगली. पैसा, जीवन पद्धती बाजूला ठेवली तर मुख्य कारण टेक्निकल एज्युकेशन. इथली अप्रतिम शिक्षणपद्धती,application आणि industry oriented. तुम्ही मास्टर झालात की तुम्ही त्या क्षेत्रातले राजे असता , तुमच्या

बुद्धिमत्तेला पूरक सोयी सुविधा आणि कल्पनाशक्तीला पूर्ण वाव आहे. मेक इन इंडिया चे भवितव्य भारतातील एज्युकेशन सिस्टम, वर्किंग स्टाफ आणि युवा पिढीवर पूर्ण अवलंबून आहे.

आता जर्मनीत आलेत तर इथल्या लोकांची प्रगति बघतील, ह्यांची काम करण्याची पद्धति शिकतील अशी मी तरी आशा करतो. Developed देश म्हणून जर्मनी भारताला Developing - Developed या transition मध्ये पूर्ण सहायता करेल याची खात्री आहे. आपल्यालाच विचारपद्धती बदलावी लागेल. वेळ लागेल पण ते जर झाले तर BMW,PORCHE,SIEMENS,AUDI,FISCHER,BOSCH ह्यांच्या स्पर्धेत KIRLOSKAR,TATA,BAJAJ,GODREJ सारख्या कंपन्या असतील याची मला खात्री आहे.

Nachster halt Kleve bahnhof. विचार करता करता वेळ कसं गेला समजलेच नाही. लॅपटॉप बंद केला. घरी आलो. आल्या आल्या 'हनओवर फेअर' चे तिकीट बुक केले , म्हटले बघू की आपला मेक इन इंडियाचा सिंह जर्मनी मध्ये. येत्या काही वर्षात या सिंहाच्या पालन पोषणाची जबाबदारी आमचीच तर असणारे आता !